# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 12/06/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 08 कि. मी. अंतरावरील मुर्ती ते काटोल रोडवरील परसोडी येथे दिनांक 11/06/2021 चे 14:00 वा. ते 14.30 वा. दरम्यान एमएच–40/बीजी– 1667 क्रमांकाच्या बोलोरो पिकअप गाडीच्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–32/ एजी 6496 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात फिर्यादीचा भाऊ नामे– 1) सतनामसिंग समशेरसिंग अंध्रेले वय 50 वर्ष व 2) वहीनी मुन्नीकौर सतनामसिंग अंध्रेले वय 45 वर्ष यांचे मरणास व फिर्यादीचे भावाचा नातु सुलीदरसिंग गुरूदाससिंग अंध्रेले वय 9 वर्ष याचे जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी नामे– संदिपसींग समशेरसिंग अध्रेले वय 37 वर्ष रा. ठाणेगाव जि. वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रशांत लभाने मो.नं. 9823433863 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर